# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १६५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. मल्हारी महादु पवार ,<br>मु. पो. व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. मल्हारी महादु पवार, मु.पो. व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द मंचाकडे तक्रार दि. १६.७.२०१० रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी गट क्र. ६९२ मध्ये शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी वितरण कंपनीच्या कवठे महांकाळ विभागांतर्गत संख उप विभागाकडे अर्ज देवून चलनाची रक्कम रु. ४०००/– पावती क्र.५३२२९६४ दि. २५.९.२००९ रोजी भरली आहे.

त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र.६३५ दि. २१.१२.२००९ रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ४४०४ दि. ६.४.२०१० नुसार आदेश पारीत करुन कृती मानके साध्य करण्यात अपयश आलेस ग्राहक भरपाई द्यावी असा एकतर्फी निर्णय देण्यात आला आहे. तक्रारदार यांनी दि. १९.४.२०१० चाचणी अहवाल दिला. वितरण वाहिनीचा विस्तार असलेने ३ महिन्यात दि. १८.७.२०१० पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते, तो दिला नाही म्हणून वि.प.कडून भरपाई मिळावी अशी मागणी मंचाकडे केली आहे. सदरची तक्रार मंचाकडे प्रतिधीमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.८.२०१० च्या लेखी अहवाल मंचाकडे दि. १७.८.२०१० रोजी सुनावणीचेवेळी दिला, त्यात तक्रारदाराने दि. २५.९.२०१० ला चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दि. १९.४.२०१० ला दिल्याचे मान्य केले. त्यांचे ०.४२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. त्यासाठी त्यांना पोल देण्यात आलेले आहेत. लवकरच त्यांचे काम पूर्ण करुन देण्यात येईल.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १७.८.२०१० रोजी सुनावणी घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे यांनी तक्रारदार यांनी चाचणी अहवाल दि. १९.४.२०१० रोजी दिला असल्याने दि. १८.७.२०१० पर्यंत वीज पुरवठा देणे वि.प.वर बंधनकारक होते. तो न दिल्याने कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार भरपाई द्यावी अशी मागणी केली. या उलट, वि.प.तर्फे काम सुरु करुन लवकरच वीज कनेक्शन देण्यात येईल व त्याचा अहवाल सादर करण्याची मंचासमोर हमी दिली आहे.

उभयबाजूंच्या लेखी/ तोंडी कथनानुसार तक्रारदार यांनी दि. २५.९.२००९ रोजी चलनाचे पैंसे भरले. त्यानंतर दि. १९.४.२०१० चाचणी अहवाल दिला असल्याबाबत दुमत नाही. त्यामुळे ३ महिन्यात दि. १८.७.२०१० पर्यंत वीज कनेक्शन देणे जरुरी होते ते दिलेले नाही. उत्तरादाखल वि.प.तर्फे काम पूर्ण करुन लवकरच कनेक्शन देण्यात येईल असे सांगण्यात आले. त्यामुळे कृती मानकातील तरतुदीप्रमाणे विलंबाच्या प्रति आठवड्यास रु. १००/– या प्रमाणे दि. १८.७.२०१० च्या पुढे वीज जोडणी होईपर्यंतच्या कालावधीतील विलंबासाठी भरपाई मिळण्याचा तक्रारदारास हक्क आहे व ती देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीचा कवठे महांकाळ विभाग / संख उप विभाग यांनी दि. १८.७.२०१० ते वीज जोडणी होईपर्यंतच्या कालावधीतील विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे तक्रारदार यांस भरपाई द्यावी.

३) सदरची रक्कम दोन बिलींग सायकलमधून समायोजित करण्यात यावी.

४) वितरण कंपनीने तक्रारदार यांस त्यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर प्राधान्यक्रमानुसार वीज जोडणी द्यावी व त्याचा कार्यपूर्ती अहवाल मंचास सादर करावा.

५)	सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच  व विद्युत लोकपाल ) विनियम २००६  ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६)	या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे  करता येईल.

दिनांक :	( बी. जी. पवार  )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव	:

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य	:

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार  )
अध्यक्ष

c